Vol 2 Issue 9 March 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

IMPACT FACTOR : 0.2105

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [Malaysia]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore
University of Management Sciences [PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 9, March. 2013
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

भारतातील फळ उत्पादनातील प्रगती एक-दृष्टीक्षेप

नितीन पर्वती घावटे

पीएच.डी.संशोधक विद्यार्थी, वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.

सारांशः

भारत हा कृषीप्रधान देश असून नैसर्गिकदृष्टा संपन्न आहे. भारतामध्ये सन २०११-२०१२ मध्ये एकूण लोकसंख्येपैकी ५५ टक्के लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवरच अवलंबून असून स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचा १३ टक्के वाटा आहे. भारताने सन १९९१ पासून खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यापासून देशातील सर्वच क्षेत्रामध्ये स्पर्धा व गुणवत्ता वाढीस लागली आहे. या स्पर्धच्या युगात शेती व्यवसाय अधिक कार्यक्षम व स्पर्धाक्षम कसा करता येईल या दृष्टिकोनातून शेतीचे व्यावसायिकीकरण करण्यात येऊलागले आहे.

प्रस्तावना :—

शेतीच्या ठराविक क्षेत्रातून किती उत्पादन मिळाले, यापेक्षा ठराविक क्षेत्रातून किती अधिक उत्पन्न मिळविले याचा विचार प्रत्येक शेतकरी करु लागला आहे. त्यादृष्टीने फलोत्पादन पिकांचे महत्त्व वाढत आहे. भारत जगात दुसऱ्या क्रमांकाचा फळ उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनापैकी १० टक्के फळांचे उत्पादन भारतात होते. भारताला फळांच्या निर्यातीतून अधिक प्रमाणात परकीय चलन मिळू लागले आहे. परिणामी देशातील विविध राज्यात फळबाग लागवडीखालील क्षेत्रात व उत्पादनात वाढ होत असून ग्रामीण भागातील अल्प व अत्यंल्प भूधारक शेतकऱ्यांना रोजगार मिळल्याने आर्थिक स्थैर्य येवून त्यांच्या सामाजिक जीवनमानात सुधारणा होत आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे (Objecttive)

१.भारतामधील प्रमुख फळपिकांचे क्षेत्र उत्पादन व उत्पादकतेचा प्रगतीचा आढावा घेणे.
२.प्रादेशिक अनुकूलतेनुसार फळबाग लागवडीचा अभ्यास करणे.

अभ्यास पध्दती : (Study Method)

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोताद्वारे माहिती व आकडेवारी संकलित केली आहे. फळबागांची माहिती व आकडेवारी विविध संकेतस्थळे, मासिके, शासकिय आर्थिक व सामाजिक सर्व्हेक्षणे, सांख्येकिय रिपोर्ट इत्यादीच्या साह्याने माहिती संकलित केली आहे. संकलित माहितीचे शास्त्रीय पध्दतीने वर्गीकरण, सारणीकरण व शेकडेवारी पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

भारतामध्ये फलोत्पादन विभागामार्फत प्रादेशिक अनुकूलतेनुसार फळबाग लागवडीला अनुदानाच्या साह्याने पोत्साहन देण्यात आले आहे. भारतामध्ये वेळोवेळी फळबाग लागवड, ठिंबक सिंचन, फळबाग विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे.

भारतामधील फळबागांच्या लागवडीखालील वर्षनिहाय झालेली प्रगती

भारतामधील वैविधपूर्ण भौगोलिक रचना, हवामानात आणि जमिनीमुळे एकाचवेळी विविध पिकांचे उत्पादन घेणे सहज शक्य आहे. भारतामध्ये सन १९८४ मध्ये फलोत्पादन विभागाची स्थापना झाली असून सन १९८८ मध्ये ठिंबक सिंचन योजना राबविण्यात आली. सन २००१ मध्ये फलोत्पादन लागवड व विकास कार्यक्रम व सन २००५-०६ मध्ये संपूर्ण देशाच्या पातळीवर राष्ट्रीय फलोत्पादन अभियान कार्यक्रम राबविण्यात आला. त्यामुळे देशातील फळबागांची लागवड, उत्पादन व उत्पादक्ता वाढीस लागली आहे. ती तक्ता क्रमांक १.३ मध्ये दर्शविली आहे.

Title :भारतातील फळ उत्पादनातील प्रगती एक-दृष्टीक्षेप
Source:Golden Research Thoughts [2231-5063] नितीन पर्वती घावटे **yr:2013 vol:2 iss:9**

तक्ता क्रमांक १ :
भारतामधील वर्षनिहाय फळांच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता व अभिवृध्दी दर

अ.क्र.	वर्ष	क्षेत्र (००० हेक्टर)	उत्पादन (००० मे. टन)	उत्पादकता (प्रति/हे.मे.टन)	५शी संबंधीत वाढ/घट
१	२	३	५	७	८
१	१९९०-९१	२८७४	२८६३२	१०	०
२	२००१-०२	४०१०	४३००१	१०.७	१९.२
३	२००२-०३	३७८८	४५२०३	११.९	२.९
४	२००३-०४	४६६१	४५९४२	९.९	१.०
५	२००४-०५	५०४९	५०८६७	१०.१	६.६
६	२००५-०६	५३२४	५५३५६	१०.४	६.०
७	२००६-०७	५५५४	५९५६३	१०.७	५.६
८	२००७-०८	५८५७	६५५८७	११.२	८.०
९	२००८-०९	६१०१	६८४६६	११.२	३.८
१०	२००९-२०१०	६३२९	७१५१६	११.३	४.१
११	२०१०-२०११	६३८३	७४८७८	११.७	४.४९
१२	१९९०-९१ ते २००१-०२ काळातील वार्षिक सयुक्त अभिवृध्दी दर	३.३८	४.१५	०.६७	०
१३	२००१-०२ ते २०१०-११ काळातील वार्षिक सयुक्त अभिवृध्दी दर	५.३०	३.३६	०.९९	०.३२
१४	१९९०-९१ ते २०१०-११ काळातील वार्षिक सयुक्त अभिवृध्दी दर	४.२८	५.१८	.८२	०.१६

संदर्भ : Indian Horticulture Database – 2009-10, P. N. 18.

तक्ता क्रमांक१ वरुन असे आढळून येते की, सन १९९०-९१ मध्ये फळबागांच्या लागवडीखालील एकूण क्षेत्र २८७४ हजार हेक्टर झाले. त्यामध्ये सन १९९०-९१ ते २००१ पर्यंत दहा वर्षांमध्ये ४०१० (७२ टक्के) हजार हेक्टर एवढी वाढ झाल्याचे झाली आहे. सन २००१-०२ मधील लागवडीखालील क्षेत्र ४०१० (६२.८२ टक्के) हजार हेक्टर वरुन सन २००९-१० मध्ये ६३८३ (६४ टक्के) हजार हेक्टर पर्यत वाढ झाली आहे. त्यामुळे फळबागांच्या लागवडीखालील क्षेत्रात दोन दशकामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. भारतामध्ये फळबागाच्या लागवडीप्रमाणेच फळबागांच्या उत्पादनात वाढ झाली आहे. सन १९९०-९१ मध्ये फळबागांचे एकूण उत्पादन २८६३२ (४५.०३ टक्के) हजार में.टनावरुन सन २००१-०२ पर्यंत ४३००१ (६७ टक्के) हजार में.टन झाले आहे. तर सन २००१-०२ मध्ये ४३००१ (६७ टक्के) हजार में.टनावरुन सन २००९-१० मध्ये ७१५१६ (६० टक्के) वाढ झाली आहे. भारतामध्ये दोन दशकामध्ये फळबागांच्या लागवडीखालील क्षेत्रात २२२ पटीने तर उत्पादनात २६१ पटीने वाढ घडून आली.भारतामधील फळबागांच्या प्रती/हेक्टरी उत्पादकतेत सरासरी १० में.टन वरुन ११.७ में.टन म्हणजे प्रती/हेक्टरी १.७० में.टन इतकी वाढ घडून आली आहे. थोडक्यात सन १९९० नंतर फळबाग लागवडीखालील क्षेत्रात २२२ पटीने तर उत्पादनात २६१ पटीने वाढ झाली आहे.भारतामध्ये फळबागांच्या लागवड व उत्पादनात सतत वाढ होत आहे. भारतामध्ये फळबाग लागवडीखालील पहिला टप्पा (सन १९९०-९१ ते २००१-०२) दुसऱ्या टप्प्यात (२००१-०२ ते २०१०-११) लागवडीचे क्षेत्र, व उत्पादकता वाढीचा संयुक्त अभिवृध्दी दर अनुक्रमे ३.३८ टक्क्यावरुन ५.३० टक्के, उत्पादन ४.१५ टक्के व ३.३६ टक्के वाढ झाली आहे. उत्पादकतेमध्ये ०.६७ टक्क्यावरुन ०.९९ टक्के वाढ झाली आहे.तर एकूण संदर्भकाळात १९९०-९१ ते २०१०-११ पर्यत लागवडीखालील क्षेत्र ४.२८ टक्के, उत्पादनात ५.१८ टक्के, व उत्पादकता ०.८२ टक्क्यांनी वाढली आहे असे आढळून येते.

भारतातील फळबागांचे राज्यनिहाय लागवडीखालील क्षेत्र उत्पादन व उत्पादकता

भारतामधील विविध राज्यातील भौगोलिक रचना, हवामान व जमिनीचा प्रकार भिन्न असल्याने विशिष्ट राज्यामध्ये विशिष्ट फळबागांचे चांगल्या प्रकारे उत्पादन होत आहे.भारतामधील फळबागांचे राज्यनिहाय लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता तक्ता क्रमांक२ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक२ वरुन असे स्पष्ट होते की, भारतामधील सन २००१-०२ ते २००९-१० या दहा वर्षाच्या कालावधीत फळबागांच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. भारतामध्ये सन २००९-१० नुसार एकुण ६३२९.२ हजार हेक्टर क्षेत्रावर फळबागांची लागवड झाली आहे.भारतामध्ये सर्वात अधिक फळबाग लागवड महाराष्ट्र राज्यात १५४०.६(२४.३४ टक्के) हजार हेक्टर झाली असून प्रथम क्रमांक आहे. आंध्रप्रदेश ९२१.१ (१४.५५ टक्के) हजार हेक्टर, उत्तरप्रदेश ३५६.७ (५.६४ टक्के) हजार हेक्टर, गुजरात ३५२.९ (५.५८ टक्के) हजार हेक्टर, कर्नाटक ३५१ (५.५५ टक्के) हजार हेक्टर, ओरिसा ३०२.१ (४.७७ टक्के) हजार हेक्टर, केरळ २९६.७ (४.६९ टक्के) हजार हेक्टर, बिहार २९३.६ (४.६४ टक्के) हजार हेक्टर, तामिळनाडू २९१.६ (४.६१ टक्के) हजार हेक्टर आहे. सर्वात कमी फळबागेची लागवड गोवा राज्यात ११ (०.१७ टक्के) हजार हेक्टर क्षेत्र आहे.

भारतामध्ये सर्वाधिक फळबागांचे उत्पादन आंध्रप्रदेशात १२९१८ (१८.०६ टक्के) हजार में.टन महाराष्ट्र १०३९७ (१४.५४ टक्के) हजार हेक्टर, गुजरात ६९८५.१ (९.७७ टक्के) हजार में.टन, तामिळनाडू ६३७९ (८.९२ टक्के) हजार में.टन, कर्नाटक ५७१२.४(७.९९ टक्के) हजार में.टन, उत्तरप्रदेश ५३८०(७.५२ टक्के) हजार में.टन, मध्यप्रदेश २८६४(४ टक्के) हजार में.टन उत्पादन झाले आहे.पश्चिम बंगाल, केरळ राज्यामध्ये सरासरी ४.५ टक्के उत्पादन झाल्याचे आढळून येते.सर्वात कमी फळबागांचे उत्पादन गोवा ७८.४(०.११ टक्के) हजार में.टन उत्पादन झालेले आहे.

तक्ता क्रमांक२

भारतामधील प्रमुख राज्यातील फळांच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता

अ.क्र	राज्य	क्षेत्र (००० हेक्टर)		४ संबंधीत टक्केवारी	उत्पादन (००० मे. टन)		७ संबंधीत टक्केवारी	उत्पादकता (हेक्टरी/मे.टन)	
		२००१-०२	२००९-१०		२००१-०२	२००९-१०		२००१-०२	२००९-१०
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	आंध्रप्रदेश	५७५.८	९२१.१	१४.५५	६१५७.४	१२९१८.३	१८.०६	१०.७	१४
२	महाराष्ट्र	५८२.८	१५४०.६	२४.३४	८८४०.६	१०३९७	१४.५४	१५.२	६.७
३	गुजरात	१४९	३५२.९	५.५८	२३४६.९	६९८५.१	९.७७	१५.७	१९.८
४	तामिळनाडू	२२७.५	२९१.६	४.६१	४३४२.४	६३७९	८.९२	१९.१	२१.९
५	कर्नाटक	२५७.१	३५१	५.५५	४०२८.९	५७१२.४	७.९९	१५.७	१६.३
६	उत्तरप्रदेश	२८८.३	३५६.७	५.६४	२२८२.८	५३८०.१	७.५२	७.९	१५.१
७	बिहार	२७२.३	२९३.६	४.६४	२८७७	३४६४.९	४.८४	१०.६	११.८
८	मध्यप्रदेश	४६.६	११३.१	१.७९	१४४३.८	२८६४	४.००	२४.६	२५.३
९	प.बंगाल	१४७.६	२०८.३	३.२९	१९८५.५	२८६१	४.००	१३.५	१३.७
१०	केरळ	२३४.५	२९६.७	४.६९	१७७२.६	२३९८.३	३.३५	७.६	८.१
११	ओरिसा	३२५	३०२.१	४.७७	१३६२.९	१८४५.१	२.५८	६.१	६.१
१२	आसाम	११०.८	११७.३	१.८५	१३३५.१	१५७५.५	२.२०	१२	१३.४
१३	जम्मू काश्मीर	१४२.२	२०९.८	३.३१	१०००.९	१५३४.७	२.१५	७	७.३
१४	पंजाब	३७.५	६७.६	१.०७	५३१.७	१३६५.१	१.९१	१४.२	२०.२
१५	छत्तीसगड	१४.४	१२५.३	१.९८	२०३.१	११८५.९	१.६६	१४.१	९.५
	इतर	५९८.८	७८१.५	१२.३५	२४८९.३	४६४९.१	६.५०	१०.७	११.३
	एकूण	४०१०.२	६३२९.२	१००	४३०००.९	७१५१५.५	१००		
२००१-०२ ते २०१०-११ काळातील वार्षिक सयुक्त अभिवृध्दी दर		०	५.३०		०	३.३६		०	०.९९

संदर्भ : Indian Horticulture Database – 2010, P.N. 8.

सन २००९-१० च्या आकडेनुसार सर्वाधिक प्रति/हेक्टरी उत्पादकता मध्यप्रदेश २५.३ में.टन, पॉन्डेचेरी २२.३ में.टन, तामिळनाडू २१.९ में.टन, राजस्थान २१.१ में.टन, गुजरात १९.८ में.टन उत्पादकता आहे. सर्वात कमी उत्पादक्ता महाराष्ट्र राज्याची उत्पादकता १५.२ में.टनवरुन ६.७ में.टन इतकी कमी झाली आहे. थोडक्यात भारतामध्ये सर्वाधिक फळबागांची लागवड महाराष्ट्र राज्यात २४.३४ टक्के असून उत्पादन १४.५४ टक्के आहे. आंध्रप्रदेशात फळबागांची लागवड १४.५५ टक्के असून सर्वाधिक उत्पादन १८.०६ टक्के असून देशात प्रथम क्रमांकावर आहे. तर प्रति/हेक्टरी सर्वाधिक उत्पादकता मध्यप्रदेश २५.३ में.टन आहे. भारतामध्ये सर्वाधिक अघाडीवर आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात , तामिळनाडू, कर्नाटक व उत्तरप्रदेशात एकूण ६६.८० टक्के उत्पादन झालेले आहे.त्यामुळे भारतामधील प्रमुख फळबाग उत्पादक राज्य म्हणून या राज्याची ओळख आहे.

भारतामधील प्रमुख फळबागांचे राज्यनिहाय क्षेत्र आणि उत्पादन

भारतामधील विविध राज्यातील वैचित्रपूर्ण हवामान, जमीन व पर्जन्यमानामुळे विविध प्रकारच्या फळबागांची लागवड व उत्पादन होत आहे. विविध राज्यातील विशिष्ट हवामान व जमिनीमुळे कमी खर्चातून अधिक उत्पादन मिळविणे सहजशक्य आहे. भारतामधील विविध राज्यातील फळे त्यांच्या गोडी व गुणवत्तेमध्ये जगप्रसिध्द आहेत. भारतातील प्रमुख फळबागांचे राज्यनिहाय लागवड व उत्पादन तक्ता क्र. १.५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्रमांक ३

भारतामधील प्रमुख फळबागांचे क्षेत्र व उत्पादन (सन २००९-१०) (अीशर '०००' हर, झीर्वीळेप-'०००' चढ)

	राज्य	सफरचंद		केळी		संत्रा		द्राक्ष		आंबा		डाळिंब		चिकू		इतर		एकुण			
		A	P	A	P	A	P	A	P	A	P	A	P	A	P	A	P	A	%	P	%
1	आंध्रप्रदेश	०	०	८०.१	२८०४	२७१	३७५३	३	६२	४९७	२५२२	६.५	६५	२०	२०६	५५.२	५७२	९३२.८	१४.२८	९९८४	१४.२५
2	आसाम	०	०	५४	८३५	२०.३	२०५	०	०	४.८	४७.९	०	०	०	०	५८.९	७६४	१३८	२.११	१८५२	२.६४
3	बिहार	०	०	३२.२	१४१७	१८	२२५			१४६	८७६	०	०	०	०	९७.८	९१२	२९४	४.५०	३४३०	४.९०
4	छतीसगड	०	०	११.५	२९६.९	८.६	५५.८	०	०.१	४३.३	१९२	०.१	०.४	०.२	०.७	६३.८	६५६	१२७.५	१.९५	१२०२	१.७२
5	गुजरात	०	०	६१.९	३७८०	३७.१	३८६	०	०	१२१.५	८५७	४.४	४६	२७	२७३	७७.१	१४५३	३२९	५.०४	६७९५	९.७०
6	हरियाणा	०	०	०	०	१३.६	१०४	०.१	२.१	९.१	६४.६	०	०	०	०	१८.६	१३२	४१.४	०.६३	३०२.७	०.४३
7	हिमाचल	९७.४	२८०.१	०	०	२१.६	२८.१	०	०	३८.४	२४	१.१	०.५	०	०	४६	५०	२०४.५	३.१३	३८२.७	०.५५
8	जम्मू-काश्मीर	१३८.२	१३७३	०	०	१२.८	१९.१	०.३	०.४	१०.७	१२.१	०	०	०	०	४७.५	१३०	२०९.५	३.२१	१५३५	२.१९
9	झारखंड	०	०	२.७	५५	४.३	५३.३			१५.१	२५४	०	०	०	०	२९.४	९७७	५१.५	०.७९	१३३९	१.९१
10	कर्नाटक	०	०	८१.२	२०२३	१६.४	२८७	१६	२८९	१४७.५	१६८८	१५	१४५	२९	३२५	१२६	०	४३१.१	६.६०	४७५७	६.७९
11	केरळ	०	०	५९.८	४७२.९	०	०	०	०	७६.७	४४५	०	०	०	०	१८४	१६४१	३२०.५	४.९१	२५५९	३.६५
12	मध्यप्रदेश	०	०	३६.८	१८६८	४२.२	६७६	०.५	१२.५	१६.३	१४७	०	०	०	०	२७.१	३२२	१२२.९	१.८८	३०२६	४.३२
13	महाराष्ट्र	०	०	८५	५२००	२८७.६	१७२५	८२	४४०	४७४.५	५९७	९९	५५६	६९	२९८	४४४	१५८१	१५४१.१	२३.५९	१०३९७	१४.८४
14	मणिपूर		०	५.६	७१.७	७.२	५४.९	०	०	०	०	०	०	०	०	२९.६	२१५	४२.४	०.६५	३४१.६	०.४९
15	ओरिसा	०	०	२४.५	३५४	२७.५	२४३	०	०	१७७.३	५१२	०.२	०.८	३.३	१६.३	६८	५८३	३००.८	४.६१	१७०९	२.४४
16	पंजाब	०	०	०.१	५.८	४२.४	९०४	०.५	१५.५	६.४	९३.६					१८.१	३४५	६७.५	१.०३	१३६४	१.९५
17	राजस्थान	०	०	०.१	०.८	१९.८	३०८	०	०	६	९३	०.८	४.८	०	०.१	२२.६	२७०	४९.३	०.७५	६७६.७	०.९७
18	तामिळनाडू	०	०	१३३	६३६८	१२.१	४७.४	३.१	८९.२	१५१.६	८३१	०.४	११	७.७	१९३	२३	४७६	३३०.९	५.०७	८०१६	११.४४
19	उत्तरप्रदेश	०	०	२.५	८४.८	०.७	१.६	०	०	२७६.६	३५७०	०	०	०	०	७२.७	८९९	३५२.५	५.४०	४५५५	६.५०
20	उत्तरांचल	३२.७	१३२.३	०	०	२६.७	१३०	०	०	३७.७	११५	०	०	०	०	७४.६	३४८	१७१.७	२.६३	७२५.३	१.०४
21	इतर	१०.८४	९.८५	७३.८	१३४९	९०.२७	५८१	०.२	०.१	१०५.४	७१०	०.९	५.१	४.३	४६.१	१८७	२४१८	४७२.७०६	७.२४	५११९	७.३१
	एकुण	२७९.१४	१७९५	७४४.८	२६९८६	९८०.२	९७८७	१०५.७	९१०.९	२३६२	१३६५१	१२८.४	८३४.६	१६०.५	१३५८	१७७१	१४७४४	६५३१.६१	१००	७००६७	१००
	%	४.२७	२.५६	११.४०	३८.५१	१५.०१	१३.९६	१.६२	१.३०	३६.१६	१९.४८	१.९७	१.१९	२.४६	१.९३	२७.११	२१.०४	१००		१००	

संदर्भ : National Horticulture Database – २०१०, P. N. २७

तक्ता क्रमांक ३ वरुन असे स्पष्ट होते की, सन २००९-१० नुसार भारतामधील एकूण फळबागांपैकी सर्वाधिक केळीचे ३८.५१ टक्के, आंबा १९.४८ टक्के, संत्रा १३.९६ टक्के, सफरचंद २.५६ टक्के, चिक्कू १.८८९३ टक्के, द्राक्ष १.३० टक्के, डाळिंब १.१९ टक्के व इतर फळबागांचे २१.०४ टक्के उत्पादन झाले आहे. भारतामध्ये एकूण फळबागांपैकी आंबा, केळी आणि संत्रा फळपिकांचे ७१.९५ टक्के उत्पादन झाले आहे. भारतामधील विविध राज्यातील हवामान व जमिनीनुसार सफरचंदाचे ९९.४४ टक्के उत्पादन जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तरांचल, केळीचे ६८ टक्के उत्पादन तामिळनाडू, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात होते.तर संत्रा ७५ टक्के उत्पादन आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, पंजाब आणि मध्यप्रदेशात होते.भारतातील द्राक्षांचे एकूण उत्पादनापैकी ९५ टक्के उत्पादन महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूत होते. पेरुचे ६५ टक्के उत्पादन आंध्रप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, झारखंड, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये होते. आंबा फळबागांचे ७५ टक्के उत्पादन आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू आणि महाराष्ट्र राज्यात होते. डाळिंबाचे ८५ टक्के उत्पादन महाराष्ट्र आणि कर्नाटकात होते. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ६७ टक्के उत्पादन होत भारतामध्ये पपईचे सर्वाधिक २२ टक्के उत्पादन गुजरात, लिची ३० टक्के उत्पादन बिहार, इतर विविध फळबागांचे ५१ टक्के उत्पादन महाराष्ट्र, कर्नाटक व केरळ राज्यात होते. भारतामधील विविध राज्यातील भोगोलिक रचना, हवामान व जमिनीनुसार विशिष्ट फळपिकांची अधिक प्रमाणात लागवड व उत्पादन होत आहे.

उपाययोजना

१.भारतामध्ये प्रादेशिक अनुकूलतेनुसार फळबागांच्या लागवडीला चालना देण्यासाठी उच्च मुंल्याकित फळबाग रोपवाटिकाची स्थापना करणे.
२.प्रादेशिक अनुकूलतेनुसार फळबाग लागवड व ठिंबक सिंचनासाठी शासनामार्फत १०० टक्के अनुदान तत्काळ संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावीत.
३.फळबागांसाठी आधुनिक कृषी औजारे, खते व औषधे कमी दरात उपलब्ध करुन दयावीत.
४.फळबाग शेतकऱ्यांचे राज्यनिहाय व फळपिकनिहाय संघटना व बचत गटाची स्थापना करुन फळबाग लागवड व विक्रीसंबंधी अडचणी सोडविण्यासाठीं प्रयत्न करणे.
५.फळांना बाजारपेठामध्ये एकच कमिशन दर निश्चत करुन व्यापाऱ्यांमार्फत होणारी फसवणूक व पिळवणूक आळा घालणे.
६.फळांना आंतरराष्ट्रीय निर्यातीस चालना देण्यासाठी निर्यातकेंद्र व अर्थसहाय्य करणे.
७.फळांच्या मुंल्यवर्धनासाठी अधिक उत्पादन असलेल्या भागात प्रकिया उद्योगाची स्थापना करणे.
८.भारतामधील फळबागांना नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान भरपाई, विमा संरक्षण व मंदीच्या काळात हमी भाव मिळवून द्यावेत.

निष्कर्ष

थोडक्यात सन १९९० ते २०१० पर्यत फळबागांच्या लागवड क्षेत्रात २२२ पटीने तर उत्पादनात २६१ पटीने वाढ झाली आहे. भारतामधील राज्यनिहाय प्रादेशिक अनुकूलतेनुसार सफरचंदाचे ९९.४४ टक्के उत्पादन जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व उत्तरांचल, केळीचे ६८ टक्के उत्पादन तामिळनाडू, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, संत्रा ७५ टक्के उत्पादन आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, पंजाब आणि मध्यप्रदेशात होते. द्राक्षांचे ९५ टक्के उत्पादन महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूत, पेरुचे ६५ टक्के उत्पादन आंध्रप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, आंबा ७५ टक्के उत्पादन आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू ,महाराष्ट्र, डाळिंबाचे ८५ टक्के उत्पादन महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात होते.यावरुन असे स्पष्ट होते की, भारतामधील विविध राज्यात वैशिष्टपूर्ण भोगोलिक रचना, हवामान, जमिनीमुळे विशिष्ट प्रकारच्या फळबागांची लागवड व उत्पादन अधिक प्रमाणात वाढ होत आहे.

संदर्भ

१.Govt. of India Agricultural Ministry – Servey Report 2011-12, Pp 67.
२.पाटील अ. व्य. (२००२), ''फळबाग तत्त्वे आणि पद्धती'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृ. १-२.
३.महल्ले जयवंत (फलोत्पादन संचालक), (२००२), '' रोहयो निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम विशेषांक'' कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन,पुणे.५, शेतकरी मासिक,फेबुवारी २००६ पृ. १ते४.
४.Singh, H.P., Singh O.P., Singh, Rakesh and Chand, (2008), "Dynamics of Area Production and Productivity in Major Fruit Crops of India"- Agricultural Economics Research Review, Vol. 21, Pp. 443.
५.Singh H.P. and Prem Nath, "State of Indian Farmer (27 olums), Ministry of Agricultural, Govt. of India, Delhi, Pp. 45.
६.WWW..icar.org.in, WWW.agricoop.nic.in

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net